Peer Reviewed Refereed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – XIV Issue – II March - April 2025

# शाळाबाह्य विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंदर्भात येणा–या समस्यांचा व उपाययोजनांचा अभ्यास

संशोधकाचे नाव
श्री. अजीम दिलखुश शेख
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

मार्गदर्शकाचे नाव
डॉ. भागवत भड
*मातोश्री आसराबाई दराडे महिला शिक्षणशास्त्र महाविद्यालय*
*यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ*
*अभ्यासकेंद्र येवला 54499*

*सारांश :–*

*कोठारी आरोग्याच्या मते भारताचे भवितव्य हे वर्गा–वर्गातून घडत आहे. असे सांगितले आहे की विद्यार्थी हा शिक्षण व्यवस्थेचा कणा मानला गेलेला आहे. शिक्षणाच्या चार आधारस्तंभ पैकी विद्यार्थी हा घटक नियमितपणे शाळेत येणे अत्यंत आवश्यक आहे. विद्यार्थी जर नियमितपणे शाळेत आला तरच त्याची अध्ययन प्रक्रिया सुलभ होऊन त्याचा बोधात्मक, भावनिक, सामाजिक सगळ्या प्रकारचा विकास होऊ शकेल, आणि सर्वांगीण विकासापर्यंत जाणे त्याला शक्य होईल. शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शाळेत दाखल करण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षणात मदत करण्यासाठी अनेक उपक्रम राबविले जातात.*

Global Online Electronic International Interdicipilinary Research Journal's licensed Based on a work at http://www.goeiirj.com

**महत्वाचे शब्द** – शाळाबाह्य विद्यार्थी, समस्या, उपाययोजना

**पार्श्वभूमी :–**

शाळाबाह्य विद्यार्थी म्हणजे ज्यांचे वय शाळेत जाण्याचे आहे, पण त्यांची नोंदणी किंवा कोणत्याही शैक्षणिक संस्थेत प्रवेश नाही, असे विद्यार्थी शाळाबाह्य विद्यार्थी साखर कारखाना, वीटभट्टी, तसेच घरची आर्थिक परिस्थिती, कौटुंबिक समस्या इत्यादी कारणांमुळे शाळाबाह्य विद्यार्थी निर्माण झालेले दिसुन येतात.

इ. स. १८१३ पुर्वी प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळा त्याकाळातही खेड्यापाड्यांतुन पसरलेल्या होत्या. साधारणपणे ४०० मुलांमागे एक प्राथमिक शाळा अस्तित्वात होती.

**इ. स. १८१३ ते १९०२ :–** इ. स. १८१३ मध्ये ईस्ट इंडिया कंपनीने हिंदुस्तानातील शिक्षणाची थोडीफार जबाबदारी स्वीकारुन दर वर्षाला एक लाख रुपये आर्थिक मदत देण्याचे ठरविले. हि मदत मंजूर होऊनही शिक्षणाचा प्रसार अतिशय मंद होता. इ. स. १८८२ मध्ये प्राथमिक शाळांत दाखल झालेल्यांची संख्या १. ६६ दशलक्ष होती. या काळात राज्यकर्त्यांनी उच्च शिक्षणाकडे

अधिक लक्ष दिले आणि प्राथमिक शिक्षण दुर्लक्षित ठेवले. या काळास **'प्राथमिक शिक्षणाचा दुर्लक्षित काळ'** असे म्हणता येईल.

**इ. स. १९०२ ते १९१८ :–** या काळात देशातील राष्ट्रीय चळवळीमुळे जनमत पुष्कळच जागृत झाले आणि त्याचा परिणाम म्हणजे सरकारने सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा करावा याबद्दल जोरदार प्रयत्न झाले. प्रथम १९१० मध्ये नामदार गोपालकृष्ण गोखले यांनी मध्यवर्ती कायदेमंडळात याबाबतचा ठराव मांडला. परंतु निर्णायक स्वरूपाच्या प्रशासकीय व आर्थिक धोरणामुळे सक्तीच्या शिक्षणाच्या कल्पनेचा स्वीकार करणे अव्यवहार्य आहे, असे तत्कालीन सरकारचे मत पडले. याकाळात सक्तीच्या प्राथमिक शिक्षण्याच्या दृष्टीने घडलेली अत्यंत महत्वाची घटना म्हणजे महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी इ. स. १८९३ मध्ये बडोदे संस्थानाच्या अमरेली महाल या भागात सक्तीच्या शिक्षणाचा सुरु केलेला प्रयोग ही होय.

**इ. स. १९१८ ते १९५० :–** देश पारतंर्त्यात असताना नामदार गोपालकृष्ण गोखले यांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणासाठी भगीरथ प्रयत्न केले. प्राथमिक शिक्षणामुळे समाजाचा एकुण दर्जाच उंचावतो. **प्राथमिक शिक्षण हा लोकशाहीच्या यशाचा मूलाधार आहे**,असे म्हटले जाते. कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांनाही प्राथमिक शिक्षण मिळालेले असेल तर त्यांच्या कार्यक्षमतेत व त्यामुळे एकूण उत्पादनात वाढ होते असे दिसून आले आहे. आपल्या देशातील समाज हा अनेक प्रकारच्या परंपरागत कल्पनांनी अजुनही बद्ध झालेला आहे. परंपरागत कल्पनांची ही धोंड प्राथमिक शिक्षणद्वारा काढुन टाकता येईल. म्हणुनच घटनेच्या ४५ व्या कलमानुसार ६ ते १४ वयोगातील मुलांना सार्वत्रिक मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्यासाठी देश कटिबद्ध झाला आहे. १०० टक्के पटनोंदणी, १०० टक्के उपस्थिती व दर्जेदार प्राथमिक शिक्षणासाठी सर्व शिक्षा अभियान ही मोहीम केंद्र सरकारने २००१ पासुन सुरु केली. त्याच बरोबर केंद्र सरकारने २००२ च्या ८६ या संविधान विशोधन अधिनियमान्वये अनुच्छेद २१(अ) मध्ये प्राथमिक शिक्षणाच्या मूलभूत अधिकाराचा समावेश केला आहे. त्यानुसार ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षण देणारा अधिनियम, Right of Children to Free and Compulsory Education Act-2009(No-35,2009) केंद्र शासनाने पारित करुन तो भारत सरकारच्या दि. २७–०८–२००९ च्या राजपत्रात प्रसिद्ध केला आहे. तसेच भारत सरकारच्या दि. १६–०२–२०१० च्या राजपत्रात सदर अधिनियम दि. ०१–०४–२०१० पासुन संपूर्ण भारतात (जम्मू व काश्मीर वगळता) लागु केला असल्याचे नमुद केले आहे. ८३ व्या घटनादुरुस्ती अधिनियमामुळे शिक्षण हा १४ वर्षापर्यंतच्या प्रत्येक बालकाचा मुलभूत हक्क बनला आहे. त्यामुळे या अधिनियमाचे पालन झाले नाही तर त्याविरुद्ध कोणालाही न्यायालयात दाद मागता येईल. शिक्षण हा बालकांचा मुलभुत अधिकार मानला गेल्यामुळे

घटनेतील कलम ५१(अ) मध्ये खंड(के) चा समावेश झाला आहे. खंड के म्हटले आहे.

Who is parent or guardian to provide opportunities for education to his child or ward (as the case may be ) between the age of six and fourteen years.

थोडक्यात स्वातंर्त्यपुर्व काळापासुन ते आजपर्यंत प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणासाठी १००टक्के प्रयत्न केले जात आहेत.

**सद्यस्थिती :–** बालकांचा मोफत आणि सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००६, राज्यात दि. ०१ एप्रिल २०१० रोजी लागू करण्यात आला. सदर कायद्यांतर्गत ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक बालकास शाळेच्या पटावर नोंदविले जाणे, बालकांनी नियमित शाळेत येणे आणि त्याला दर्जेदार शिक्षण मिळणे हा हक्क प्राप्त झाला आहे. कधीही दाखल न झालेली तसेच शाळेत न जाणारी बालके, ज्यांनी शाळेत प्रवेश घेतलेला नाही, अशी बालके (E1) किंवा ज्या बालकांनी प्रवेश घेऊन प्राथमिक शिक्षण पुर्ण केलेले नाही अशी ६ ते १४ वयोगटातील बालके एक महिन्यापेक्षा अधिक काळ सातत्याने अनुपस्थित राहत असतील तर त्या बालकांना शाळाबाह्य बालक म्हणावे (E2) अशी व्याख्या शिक्षण हक्क अधिनियमानुसार केली आहे. राज्यात आजही अनेक बालके विविध कारणांमुळे शाळाबाह्य आहेत हे वास्तव नाकारता येत नाही. कोरोना महामारीच्या मागील काही वर्षात बरेचसे कुटुंब स्थलांतरित झालेले आहे. स्थलांतरित झालेली कुटुंबे ही आर्थिक स्तर निम्न्न असल्येल्या वंचित समाजातील, गटातील, भूमिहीन अथवा अल्प भूधारक असतात. मोठ्या प्रमाणात ही कुटुंबे ऊस तोडणीसाठी पश्चिम महाराष्ट्रातील सोलापुर, कोल्हापुर, पुणे, सातारा, अहमदनगर येथे तर शेजारी असणाऱ्या कर्नाटक व गुजरात या राज्यात स्थलांतर करतात. स्थलांतराचा कालावधी हा सप्टेंबर ते मे असा असतो. याशिवाय वीटभट्टी, दगडखाण, कोळसाखाणी, शेतमजुरी ,बांधकाम व्यवसाय, सार्वजनिक बांधकाम विभागातील कामे करण्यासाठी तसेच रस्ते, नाले, जिनिंग मिल याप्रकारच्या कामांसाठी ही कुटुंबे स्थलांतर करीत असतात. अशा स्थलांतरित बालकांचे शिक्षण थांबू नये यासाठी महाराष्ट्रामध्ये मार्च २०२१ मध्ये शाळाबाह्य, अनियमित व स्थलांतरित मुलांना शाळेच्या प्रवाहात दाखल करणेसाठी विशेष शोध मोहीम दरवर्षी राबविण्यात येत आहे. या सर्वेक्षणानुसार राज्यात कधीच शाळेत न गेलेल्या ६ ते १४ वयोगातील बालकांची संख्या ७८०६ होती, ज्यामध्ये ४०७६ मुले आणि ३७३० मुलींचा समावेश होता, तर अनियमित उपस्थितीमुळे शाळाबाह्य झालेल्या बालकांची संख्या १७ हजार ३६७ होती. यामध्ये ६००८ मुले तर ८३८६ इतक्या मुली आहेत. दोन्ही मिळुन ही संख्या २५ हजार २०४ इतकी आहे. यापैकी विशेष गरजाधिष्टित असलेल्या बालकांची संख्या १२१२, बालकामगार म्हणुन बालकांची संख्या २८८ तर अन्य कारणांमुळे शाळाबाह्य होणाऱ्या बालकांची संख्या २३ हजार ७०४ इतकी आहे.

उपाययोजनाः–

१) शाळाबाह्य मुलांना जवळच्या सरकारी शाळेत दाखल केले जाते.

२) शाळाबाह्य मुलांना वयानुसार प्रवेश देऊन त्यांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात सामावून घेतले जाते.

३) समग्र शिक्षाअंतर्गत शाळाबाह्य मुलांसाठी विशेष प्रशिक्षण आयोजित केले जाते.

४) शाळाबाह्य मुलांना शिक्षण देण्यासाठी फिरती शाळा किंवा एजुकेशन ऑन व्हील असे उपक्रम राबविले जातात.

५) मिशन झिरो ड्रॉपआउट राबविणे :–

अ) मिशन झिरो ड्रॉपआउट मध्ये बालकांचा शोध घेताना ग्रामपंचायतध्न. पा. ध्म.न.पा. मधील जन्म–मृत्यु अभिलेख्यामधील नोंदीचा वापर करणे.

ब ) कुटुंब सर्वेक्षण करणे.

क) तात्पुरते स्थलांतरित कुटुंबात असणाऱ्या बालकांची माहिती या मिशन मध्ये घेण्यात येईल.

ड) मुळ वस्तीतून अन्य वस्तीत स्थलांतरित होणारी बालके.

इ) अन्य वस्तीतून शाळा वस्तीत स्थलांतरित होऊन येणारी बालके.

फ) शाळाबाह्य, अनियमित बालके यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची कार्यवाही करावी.

ग) सदरची मिशन झिरो ड्रॉपआउट मोहीम वस्ती, वाडी,गाव, वार्ड या स्तरावर पुर्ण करण्यात यावी.

**संदर्भसूची :–**

१) घोरमोडे के. यु. (२००८) शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे नागपुर, विद्या प्रकाशन.

२) जोशी अनंत (१९९६) संशोधन अहवालाची लेखन पद्धती, नाशिक, वाय.सी एम.ओ.यु.,नाशिक.

३) पाटील लीला (१९७१) आजचे अध्यापन, पुणे, श्री. विद्या प्रकाशन.

४) बापट भा.गो. (१९७५) शैक्षणिक संशोधन पुणे, नूतन प्रकाशन.

५) भिंताडे वि. रा. (२०००) शैक्षणिक संशोधन पद्धती पुणे, नूतन प्रकाशन .

**वेबसाईटः–**

www.maharashtra.gov.in